SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR, MAHARASHTRA STATE (INDIA) - 416 004.
PHONE : EPABX- 2609000, (Inquiry Cell) 2609143, (EST) 2609097, 98, 99 (EST-PG) 2609100.
FAX :0091-0231-2691533 & 0091-02312692333
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, महाराष्ट्र राज्य (भारत) - ४१६ ००४
दूरध्वनी : (इपीएबीएक्स) २६०९०००] ( चौकशी )] २६०९१४३ (आस्थापना) २६०९०९७, ९८, ९९, (आस्थापना/पीजी) २६०९१००.
फॅक्स : ००९१-०२३१-६९१५३३ व ००९१ - ०२३१-२६९२३३३

Estd: 1962
"A++" Accredited by NAAC
(2021) with CGPA 3.52

जा.क.आस्थापना पी.जी./1669 दि. 25 NOV 2021

प्रति,

संचालक
दूर शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विषयः— दूर शिक्षण केंद्राअंर्तगत एम.बी.ए. कोर्स ऑन लाईन मोड मध्ये सुरू करण्याच्या प्रस्तावाबाबत

संदभ :— आपली दि. 06/09/2021 रोजीची टिपणी

महोदय,

उपरोक्त विषय संदर्भात आपणांस आदेशान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2021—22 पासुन दूर शिक्षण केंद्राअंर्तगत एम.बी.ए. कोर्स ऑन लाईन मोडमध्ये सुरू करण्याच्या प्रस्तावास विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिली आहे.

सोबत याबाबत दि.16/11/2021 रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील विषय व ठराव कमांक 24 ची प्रत आपल्या माहितीसाठी जोडली आहे.

कळावे,

आपला विश्वासू,

प्र.उपकुलसचिव

प्रत :—

1. अभ्यास मंडळे विभागास.
2. पदव्युत्तर प्रवेश विभागास.

E/1ESTPG/2016/Letter

Scanned with CamScanner

**MANAGEMENT COUNCIL**
**16th November, 2021**

विषय क्र.24 - शैक्षणिक वर्ष 2021-2022 पासून MBA हा कोर्स ऑनलाईन मोड मध्ये सुरु करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.

(टिपणी :- शैक्षणिक वर्ष 2021-2022 पासून दूरशिक्षण केंद्राअंतर्गत हा कोर्स MBA हा कोर्स ऑनलाईन मोड मध्ये सुरु करण्याबाबत AICTE च्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करावयाचा असून त्यानुसार सदरचा अभ्यासक्रम ऑनलाईन पध्दतीने सुरु करण्यासाठी संबंधित अधिकार मंडळाच्या मान्यता घेण्याबाबत दूरशिक्षण केंद्राकडून कळविण्यात आले आहे. विद्यापीठ अधिविभागात नवीन कोर्स सुरु करण्याची महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 मधील कलम 37 (b), 33 (s), व 31 (zc), अन्वये अनुक्रमे अधिष्ठाता मंडळाच्या शिफारशीची व विद्यापरिषदेच्या तसेच व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेची आवश्यकता आहे. सदर कलमांतील तरतूद खालीलप्रमाणे आहे .

Deans Committe

37 (b) - to consider and recommend to the Academic Council new courses, inter-disciplinary courses and short-term training programmes referred to it by faculty .

Academic Council

33 (s) - to approve new courses , inter u disciplinary courses and short-term training programmes referred to it by the board of deans.

Management Council

31 (zc) - to assess and approve proposals for academic programmes received from the academic Council.

उपरोक्त तरतुदीनुसार प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा यांनी सदर प्रस्तावास विद्याशाखेच्यावतीन अधिष्ठता मंडळास शिफारस केली आहे.

सदर विषय दि. 11/10/2021 रोजी झालेल्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत विचारार्थ सादर केला असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला आहे.

ठराव - 2 शैक्षणिक वर्ष 2021-2022 पासून दूशिक्षणकेंद्रा अंतर्गत MBA हा कोर्स ऑनलाईन मोड मध्ये सुरु करण्यास विद्यापरिषदेस शिफारस करण्यात आली

उपरोक्त अधिष्ठाता मंडळाची शिफारस दि.25/10/2021 रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीपुढे विचारार्थ सादर केली असता अधिष्ठाता मंडळाची शिफारस मान्य करण्याबाबत विद्यापरिषदेने शिफारस केली आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष 2021-2022 पासून MBA हा कोर्स ऑनलाईन मोड मध्ये सुरु करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.)

**ठराव : शैक्षणिक वर्ष 2021-2022 पासून MBA हा कोर्स ऑनलाईन मोडमध्ये सुरु करण्याबाबत विद्यापरिषदेने केलेली शिफारस मान्य करण्यात आली.**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
सभा व निवडणूका विभाग
Shivaji University, Kolhapur

Scanned with CamScanner

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416004, MAHARASHTRA
PHONE:EPABX-2609000, www.unishivaji.ac.in, bos@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर -४१६००४,महाराष्ट्र
दूरध्वनी-ईपीएबीएक्स -२६०९०००, अभ्यासमंडळे विभाग दुरध्वनी ०२३१—२६०९०९४

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

संदर्भ क्र. : शिवाजी वि./अमं /148 दिनांकः- २८/ ०२/ २०२४

प्रति,

मा. संचालक,
दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय :—दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राकडें ऑनलाईन मोडव्दारे सुरू असलेल्या एम.बी.ए.(ऑनलाईन) या पाठयक्रमाच्या अभ्यासक्रमातील नियमावली सुधारणेबाबत**

**संदर्भ :—** SU/BOS/Com & Mamt./0067 Date 04/04/2022 रोजीचे पत्र

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भानुसार आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष 2021—22 पासून दूरशिक्षण केंद्राअंतर्गत ऑनलाईन एम.बी.ए. हा अभ्यासक्रम ऑनलाईन मोडव्दारे सुरू करणेत आला. तसेच अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार SU/BOS/Com & Mamt./0067 Date 04/04/2022 रोजीच्या पत्रानुसार सदरचा अभ्यासक्रम लागू करण्यात आला आहे.

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत ऑनलाईन एम.बी.ए. अभ्यासक्रमाकरीता विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा, यु.जी.सी. अथवा ए.आय.सी.टी.ई मार्फत प्रवेश परीक्षेस अनुसरून 4 सप्टेंबर, 2020 चे राजपत्र तसेच शैक्षणिक वर्ष, 2023—24 करिता असणा—या प्रवेशाबाबतच्या मार्गदर्शक सूचना, प्रश्नपत्रिका स्वरूप, प्रवेशाची पात्रता इत्यादी बाबींचा विचार करून विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार एम.बी.ए. ऑनलाईन अभ्यासक्रम व त्याच्या नियमावलीत दुरूस्ती करण्यात आली आहे. (सोबत :सुधारित अभ्यासक्रम व नियमावली जोडली आहे.)

उपरोक्त बाब सर्व संबंधित शिक्षक व विद्यार्थी यांच्या निदर्शनास आणावे. तसेच सुधारित अभ्यासक्रम व नियमावली विद्यापीठ संकेतस्थळावर www.unishivaji.ac.in (Online Syllabus) ठेवण्यात आली आहे.

कळावे,

आपला विश्वासू

(डॉ. एस. एम. कुबल)
उपकुलसचिव

सोबत : वरील प्रमाणे

प्रत :

1. मा. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ
3. परीक्षक नियुक्ती अ व ब विभाग
4. इतर परीक्षा 1 विभाग
5. आय.टी. सेल

माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी